| | | |
|---|---|---|
| १५ | **तक्रार क्र. २५२**<br>**श्री. राजीव दत्ता.**<br>**दि. ०३/०७/२०२३.**<br>भाईंदरच्या चौक येथील खाडी किनारी मोठया प्रमाणात कांदळवनाची कत्तल केल्याची फिर्याद. | ➢ सदर तक्रारीचे अनुषंगाने अपर तहसीलदार, मिरा भाईंदर यांनी अहवाल सादर केलेला आहे.<br>➢ सदर तक्रारीचे अनुषंगाने स्थळपाहणी केली असता कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून आले. त्याअनुषंगाने संबंधितांवर गुन्हा दाखल करणेत आला आहे.<br>➢ सोबत अपर तहसीलदार, मिरा भाईंदर यांचेकडील अहवालाची प्रत जोडली आहे.<br>➢ सबब सदरची तक्रार निकाली काढणेस विनंती आहे. |
| १६ | **तक्रार क्र. २५७**<br>**श्री. राजीव दत्ता.**<br>**दि. २२/०७/२०२३.**<br>ठामपा, ठाणे अधिकारातील व कार्यक्षेत्रातील मंजूर विकास प्रस्ताव क्रमांक : S०६/००६३/२०१० (हिरानंदानी टाऊनशिप) बेकायदेशीर भराव टाकणे व कांदळवन नष्ट करुन बांधकाम केल्याबाबत प्राप्त फिर्याद. | ➢ सदर तक्रारीचे अनुषंगाने ठाणे महानगरपालिका यांनी अहवाल सादर केलेला आहे.<br>➢ प्रकरणी ठाणे महानगरपालिका यांनी विकास प्रस्तावामध्ये देण्यात आलेली पुर्व मंजूरी सागरी किनारा नियमन अधिसूचनेच्या तरतुदी विचारात घेवून देण्यात आली असलेबाबत अहवालात नमुद केलेले आहे.<br>➢ सोबत ठाणे महानगरपालिका यांचेकडील अहवालाची प्रत जोडली आहे. |
| १७ | **तक्रार क्र. २६७**<br>**श्री. धिरज परब. दि.०७/०८/२०२३.**<br>भाईंदर पश्चिम येथे बजरंग नगर भागात सरकारी जागेतील वन कायद्याने संरक्षित कांदळवनामध्ये झालेल्या बेकायदेशीर बांधकामांवर कारवाई करणेबाबत. | ➢ सदर तक्रारीचे अनुषंगाने अपर तहसीलदार, मिरा भाईंदर यांनी अहवाल सादर केलेला आहे.<br>➢ सदर तक्रारीचे अनुषंगाने स्थळपाहणी केली असता कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे निदर्शनास आले. मात्र तक्रारीतील नमुद क्षेत्र हे जमीन भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४ अन्वये अधिसूचित करुन त्याचा ताबा संरक्षणसाठी वन विभागाकडे देणेत आलेला असल्याने प्रस्तुत प्रकरणी गुन्हा दाखल होणेची कार्यवाही ही वन विभागाकडून होणे आवश्यक आहे.<br>➢ सोबत अपर तहसीलदार, मिरा भाईंदर यांचेकडील अहवालाची प्रत जोडली आहे. |

(सुदाम परदेशी)
निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे